तंत्रज्ञान अधिविभाग.
दि. २५.०९.२०२५

# सर्व प्रवर्गामधील (OPEN,EWS,Minority,SEBC, SC, ST, SBC, OBC,VJNT) स्कॉलरशीप व फ्रीशीपबाबत महत्वाची सुचना शैक्षणिक वर्ष २०२५–२६

तंत्रज्ञान अधिविभागातील बी. टेक. भाग प्रथम, द्वितीय, थेट द्वितीय, तृतीय व चतृर्थ वर्ष तसेच एम्. टेक. भाग १ व २ (Minority/SC/ST Category) करिता सन २०२५–२६ सर्व प्रवेशित विद्यार्थ्यांना कळविणेत येते की, ज्या प्रवर्गामधून प्रवेश निश्चीत झाला आहे त्या प्रवर्गामधील स्कॉलरशीप व फ्रिशीपचा (उत्पन्न मर्यादेनुसार) अर्ज महाडिबीटी पोर्टलवर ऑनलाईन भरणे बंधनकारक आहे. अर्जदाराने अर्जासोबत खालील दर्शविण्यात आलेली आवश्यक कागदपत्रे व अर्जामधील माहिती बिनचुक भरणे आवश्यक आहे. याबाबत **प्रत्येक विद्यार्थ्यांस स्वंतत्र कळविण्यात येणार नाही.**

जे विदयार्थी सदरचा अर्ज भरणार नाहीत अशा **विद्यार्थ्याच्याकडून शैक्षणिक वर्ष २०२५–२६ चे संपूर्ण शैक्षणिक शुल्क भरुन घेण्यात येईल. विषेशता प्रथम वर्ष व थेट द्वितीय विदयार्थ्यांनी याची गाभीर्याने नोंद घ्यावी.**

राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क प्रतिपुर्ती योजना, डॉ. पंजाबराव देशमुख वसतीगृह योजना, अल्पसंख्याक (महाराष्ट्र राज्य) भारत सरकार शिष्यवृत्ती व फ्रिशीपचे ऑनलाईन अर्ज भरण्याकरिता https://mahadbt.maharashtra.gov.in या संकेतस्थळाचा वापर करण्यात यावा.

उत्पन्न मर्यादा :–

**१) बी. टेक. एस्. सी. व एस्. टी. प्रवर्गामधील विद्यार्थ्यांच्याकरिता उत्पन्न मर्यादा रुपये २.५० लाख पर्यंत शिष्यवृत्ती व त्यापुढे फ्रिशीप.**

**२) एम्. टेक. एस्. सी व एस्. टी. प्रवर्गामधील विद्यार्थ्यांच्याकरिता उत्पन्न मर्यादा रुपये २.५० लाख पर्यंत शिष्यवृत्ती. एम्. टेक. करिता फ्रीशीप सवलत नाही.**

**३) बी. टेक. एन्. टी. ओबीसी, एस्बीसी, रुपये १.५० लाख पर्यंत शिष्यवृत्ती व रुपये ८ लाखापर्यंत फ्रिशीप.**

- **OBC, VJNT, SBC प्रवर्गामधील प्रवेशीत ज्या विदयार्थ्यांच्या पालकांचे उपन्न ८ लाखापेक्षा जास्त आहे पंरतू नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्राचा कालावधी वैध आहे. अशा विदयार्थ्यांनी OBC, VJNT, SBC Freeship अर्ज करावेत.**

**४) बी. टेक. खुल्या प्रवर्गाकरिता ८ लाखपर्यंत उत्पन्न मर्यादा.**

- SEBC प्रवर्गामधील प्रवेशित विद्यार्थ्यांना कळविणेत येते की, दिनांक २९.०१.२०२५ रोजीच्या सामान्य प्रशासन विभागाच्या शासन निर्णयान्वये शैक्षणिक वर्ष २०२४–२५ या शैक्षणिक वर्षापासून सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागास प्रवर्गामधील SEBC विदयार्थ्यांसाठी शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क प्रतिपुर्ती योजनेकरिता, **उत्पन्नाचा दाखला सादर करण्याची अट रद्द करण्यात आलेली असून नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे.**

विदयार्थ्यांनी अर्ज भरताना खालील महत्त्वाच्या बाबी लक्षात घेण्यात याव्यात.

| | |
|---|---|
| College Name | : Department of Technology, Shivaji University Kolhapur. |
| Course Type | : Unaided |
| Hosteller Type | : Non-Government |
| Hostel Rent | : 970 (for DOT Hostel Boys and Girls) |

<u>Upload all original or True Copy Documents on Portal</u>

<u>Upload CAP ID certificate (Admission Confirmation Letter I year or Direct Second year)</u>

SHIVAJI UNIVERSITY Department of Technology, Kolhapur.

१. सदर शिष्यवृत्तीचा नवीन अर्ज भरण्याकरिता विद्यार्थ्यांचे नवीन Login ID & Password तयार करणे आवश्यक आहे. तसेच यापुर्वी विदयालयीन महाविदयालयीन जुना Login ID & Password उपलब्ध असल्यास नवीन तयार करण्याची अवश्यकता नाही.

SHIVAJI UNIVERSITY Department of Technology, Kolhapur

२. प्रथम वर्ष व थेट द्वितीय वर्ष विदयार्थ्यांच्याकरिता New Application व द्वितीय वर्ष, तृतीय वर्ष, चतूर्थ वर्ष विदयार्थ्यांनी अर्ज Renewal Application करावयाचे आहे.

३. विदयार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज भरताना सर्व कागदपत्रे मुळ (Original) अथवा सत्यप्रती Upload करावयाचे आहेत. कोणत्याही कागदपत्राची झेरॉक्स् प्रत Upload करू नये.

४. **SC, ST, SBC, OBC,VJNT** या प्रवर्गामधील सर्व विदयार्थ्यांनी अर्जामध्ये महाविदयालयाचे Tuition Fees paid 00 (शैक्षणिक शुल्क) नोंदवण्यात यावी. तसेच फी पावतीच्या ठिकाणी विदयार्थ्यांने बोनाफाईड प्रमाणपत्र (Bonafide Certificate) Upload करावे.

५. OPEN, EWS, SEBC प्रवर्गामधील सर्व विदयार्थ्यांनी भरणा केलेली रक्कम नोंदवण्यात यावी. व सदर रक्कमेची फी पावती Upload करावी.

६. **OPEN, EWS, SEBC या प्रवर्गामधील मुलींनी शैक्षणिक शुल्क ०० नोंदवण्यात यावी व** फी पावतीच्या ठिकाणी विदयार्थ्यांने बोनाफाईड प्रमाणपत्र (Bonafide Certificate) Upload करावे.

७. SC, SBC, OBC,VJNT प्रवर्गामधील प्रवेशीत विदयार्थ्यांना उत्पन्न मर्यादेबाबत महाराष्ट्र शासन सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग शासन परिपत्रक क्रमांक : इबीसी २०१४/प्र.क्रं ४०/शिक्षण–१ मंत्रालय विस्तार भवन, मुंबई–४०००३२ दिनांक ०८ जुलै, २०१४ अन्वये कळविण्यात येते की, व्यावसायिक अभ्यासक्रमात प्रवेश घेतलेल्या व पालकाचे वार्षिक उत्पन्न मर्यादेत असलेल्या विमुक्त जाती, भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग व इतर मागास प्रवर्गामधील विद्यार्थ्यांस शैक्षणिक शुल्क प्रतिपुर्ती योजनेचा लाभ दिल्यानंतर ही सवलत अभ्यासक्रम पूर्ण होईपर्यंत अनुज्ञेय राहील. अशा विद्यार्थ्यांना दरवर्षी उत्पन्नाचा दाखला सादर करण्याची आवश्यकता राहणार नाही.

८. प्रतिज्ञापत्र, हमीपत्र, वसतीगृहात राहत असल्याबाबतचे प्रमाणपत्र झेरॉक्स् सेंटर व अधिविभागाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

## राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना अर्जासाठी आवश्यक कागदपत्रे

१. राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना अर्ज २०२५–२६ (ऑनलाईन भरलेला)
२. उत्पन्नाचा दाखला आर्थिक वर्ष २०२४–२५
३. शाळा सोडलेल्याच्या दाखला (सत्यप्रत) प्रथम व थेट द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांच्याकरिता.
४. अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate)
५. मार्कलिस्ट ( १० + १२ ) (१० + डिप्लोमा)
६. मार्कलिस्ट गत वार्षिक (क्रेडीट सिस्टीम)
७. कॅप आयडी सर्टिफिकेट (Admission Confirmation Letter I year or Direct Second year )
८. शैक्षणिक शुल्क भरणा केलेली पावती
९. गॅप प्रमाणपत्र (असेल तर)
१० प्रतिज्ञापत्र

## डॉ. पंजाबराव देशमुख वसतीगृह निर्वाह भत्ता योजना अर्जासाठी आवश्यक कागदपत्रे

१. पंजाबराव देशमुख वसतीगृह निवार्ह भत्ता योजना अर्ज (ऑनलाईन भरलेला) २०२५–२६.
२. नोदंणीकृत मजूर दाखला/अल्पभुधारक प्रमाणपत्र
३. उत्पन्नाचा दाखला आर्थिक वर्ष २०२४–२५
४. पालकांचे प्रतिज्ञापत्र
५. कॅप आयडी सर्टिफिकेट (Admission Confirmation Letter I year or Direct Second year)
६. वसतीगृह शुल्क भरणा केलेली पावती
७. वसतीगृहामध्ये राहत असल्याबाबतचे प्रमाणपत्र अथवा भाडे करार पत्र.

**SC, ST, SBC, OBC, VJNT** अर्जासोबत आवश्यक असणारी कागदपत्रे.

१. स्कॉलरशीप/फ्रिशीप अर्ज (ऑनलाईन भरलेला) २०२५–२६.
२. उत्पन्नाचा दाखला
३. रेशनकार्ड
४. जातीचा दाखला
५. जात वैधता प्रमाणपत्र
६. शाळा सोडलेल्याच्या दाखला
७. अधिवास प्रमाणपत्र
८. (१० वी + १२ वी) (१० वी + डिप्लोमा) मार्कलिस्ट
९. मार्कलिस्ट (क्रेडीट सिस्टीम) वार्षिक
१०. कॅप आयुडी सर्टिफिकेट (Admission Confirmation Letter I year or Direct Second year)
११. गॅप प्रमाणपत्र (असेल तर)
१२. वसतिगृहात राहत असल्यास प्रमाणपत्र.
१३. प्रतिज्ञापत्र

**अल्पसंख्याक शिष्यवृत्ती (महाराष्ट्र राज्य) सवलतीसाठी आवश्यक कागदपत्रे**

१. अल्पसंख्याक शिष्यवृत्ती (महाराष्ट्र राज्य) सवलतीचा ऑनलाईन अर्ज २०२५–२६.
२. उत्पन्नाचा दाखला आर्थिक वर्ष २०२४–२५ (उत्पन्न मर्यादा ८ लाख)
३. मार्कलिस्ट (१० + १२) (१० + डिप्लोमा).
४. मार्कलिस्ट गत वार्षिक (क्रेडीट सिस्टीम)
५. कॅप आयुडी सर्टिफिकेट (Admission Confirmation Letter I year or Direct Second year)
६. फी पावती
७. गॅप प्रमाणपत्र (असेल तर)
८. शाळा सोडलेल्याच्या दाखला
९.अल्पसंख्याक असल्याबाबतचे विदयार्थ्यांचे प्रमाणपत्र.

वरील दिलेल्या सुचनेनुसार सर्व कागदपत्रांची पुर्तता करून दिनांक २९.११.२०२५ रोजीपर्यंत अर्ज ऑनलाईन भरण्यात यावेत. सदरच्या अर्जाची व आवश्यक कागदपत्राची प्रत अधिविभागाच्या कार्यालयामध्ये (खोली क्रमांक १०२) जमा करावी.

प्र.संचालक
Director
Department of Technology
Shivaji University, Kolhapur